संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नाट्यसंमेलन आणि सद्यस्थिती

**संपूर्ण** देश आज एका वेगळ्या मनस्थितीत आहे. अशावेळी काही कार्यक्रम आणि उपक्रमसुध्दा ही मनस्थिती पाहूनच झाले पाहिजेत. त्या कार्यक्रम आणि उपक्रमांमधली विधाने, भाषणे, किंवा विचारव्यक्त करण्याची पध्दत तितकीच संयमाची राहिली पाहिजे. नागपूर येथे सुरु झालेल्या नाट्य संमेलनाच्या उदघाटकांनी जे विचार व्यक्त केले ते आजच्या सामाजिक परिस्थितीशी जुळणारे जरी असले तरी राष्ट्रीय परिस्थितीचा विचार केला तर ते काहीसे विसंगत वाटतात. मुळात तीन दिवस चालणारा हा नाट्यसंमेलनाचा प्रकार पुलवामा हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर एक किंवा दीड दिवसात आटोपता आला असता. परंतु नेहमीप्रमाणे सांग्रसंगीत असा तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला गेला आणि त्याच स्वरुपाची भाषणे झाली आणि नेहमीसारखाच उत्साह दाखवला गेला. परंतु ते करीत असताना पुलवामा जिल्ह्यातील शहिदांना श्रध्दांजली वाहून आपली जबाबदारी संपत नाही तर या पाकिस्तानने हा हल्ला घडवला. त्यांच्या मनोवृत्तीचा समाचार घेण्याचा प्रयत्न फारसा झालेला दिसला नाही. पुलवामातला हल्ला हा एका राष्ट्रीय कटाचा भाग होता. हे नीट लक्षात घेतले पाहिजे. अशावेळी संपूर्ण देशाला धक्का देणाऱ्या या घटनेचा समाजातील प्रत्येकाने कठोरपणे समाचार घ्यावा, अशाच स्वरुपाचे ठरते. नाट्यसंमेलनातील पाकिस्तानचा निषेध आणि संपूर्ण देशाच्या एकजुटीची ग्वाही दिली गेली असती तर ते जास्त संयुक्तिक ठरले असते. परंतु त्याऐवजी देशातल्या अंतर्गत परिस्थितीवर भाष्य केले गेले. नाट्यसंमेलनाच्या विषयाला सोडून मतप्रदर्शन झाल्याचे दिसून येते.याऐवजी भारतावर वारंवार उद्भवणाऱ्या या परिस्थितीचे विश्लेषण केले गेले असते आणि नाटकासारखे माध्यम अशा राष्ट्रीय संकटाच्यावेळीसुध्दा आपली जबाबदारी कशी ओळखू शकते. हे जर सांगितले गेले असते.एकूणच नाटक या माध्यमाची उंची वाढवणारे ठरले असते. नाट्यसंमेलनाची भाषणे ही जवळपास साहित्य संमेलनातल्या भाषणांसारखीच झाली. देशातले विचार स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य कसे धोक्यात आलेले आहे, असाच सूर लावला गेला. परकीय शत्रूमुळे मुळातच देश धोक्यात असताना देशांतर्गत अशा प्रकारच्या धोक्यांची या प्रसंगी चर्चा करणे किंवा त्याविषयी मतप्रदर्शन करणे हे फारसे विवेकीपणाचे लक्षण ठरत नाही.

## सध्याची परिस्थिती

साहित्य संमेलन नाट्य संमेलन किंवा ही दोन्ही माध्यमे प्रामुख्याने विचारांचा प्रसार करणारी ठरतात. तिथे अविवेकाला थारा असता कामा नये. प्रसंग, त्याचे औचित्य आणि त्याच्याशी निगडीत योग्य ते विचार मांडले जाणे किंवा त्याचा प्रचार प्रसार करणे ही या माध्यमांची तितकीच मोठी जबाबदारी ठरते. महाराष्ट्राच्या नाट्य चळवळीला अनेक ऐतिहासिक संदर्भ आहेत. साठ सत्तरवर्षापूर्वीची नाटके बघितली तर सामाजिक आणि राजकीय विषयांवर भाष्य करणारी सादर होत असत. अनेक अभिनयाच्या माध्यमातून मर्मभेदी प्रहार करण्याचे काम नाटकांनी केलेले आहे. समाजाला आणि देशाला पूरक अशी या दोन्ही माध्यमांची भूमिका सर्वसामान्यांनाही मान्य होत असे आणि म्हणून प्रेक्षकही नाटके पाहाण्यासाठी गर्दी करत असत. एवढेच नव्हे तर त्या नाटकांमुळे लोकांची राष्ट्रीय भावना वाढीला लागत असे. अशा प्रकारच्या अनेक नाटकांची उदाहरणे देता येतील. हा इतिहास नाट्यचळवळीचा गौरव वाढवणाराच आहे. समाजातले दोष , उणिवा, या नाटक चित्रपटांमधून मांडल्या गेल्या पाहिजेतच, त्यातून समाजाला मार्गदर्शनही झाले पाहिजे. याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. परंतु यावेळचे नाट्यसंमेलन ज्या काळात आणि ज्या पार्श्वभूमीवर भरते आहे. ते कारण गंभीरपणे लक्षात घ्यायला हवे. भारतात जातीव्यवस्था आहेत. भारत धर्माधर्मामध्ये मतभेद आहेत. आपल्या देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही विचारस्वातंत्र्याची गळचेपी होते. प्रतिकुल बोलणाऱ्याला बोलू दिले जात नाही. ती व्यक्ती म्हणेल तोच धर्म किंवा ती व्यक्ती सांगेल तोच योग्य विचार अशी जबरदस्तीची किंवा धाक दाखवणारी परिस्थिती भारतात किंवा महाराष्ट्रात असल्याचा आरोप नेहमी होत असतो. या सगळ्या गोष्टी शंभर टक्के जरी खऱ्या असल्या तरी त्याबाबत तक्रार करण्याची ही वेळ नाही असे वाटते. देश जवळपास युध्दाच्याच छायेखाली आहे. एकीकडे राज्य व्यवस्थेसाठी किंवा देशाच्या प्रशासन व्यवस्थेसाठी निवडणुका घेणे क्रमप्राप्त ठरते. त्या निवडणुकांची वेळ येऊन ठेपलेली आहे.

## विचार करूनच मतप्रदर्शन

अर्थातच राज्यकर्ते त्यांच्या राजकीय स्वार्थाला तितकेच प्राधान्य देतील आणि पाकिस्तानला जो काही धडा शिकवायचा आहे तो निवडणुकीनंतरच शिकवतील यातही काही शंका उरत नाही. आपण ज्या लोकशाही व्यवस्थेत राहातो. त्यातली ही एक मजबुरी आहे असे म्हटले तरी चालेल. आणि आता तर आपण अशा एका सीमारेषेवर आहोत की निवडणुका की पाकिस्तानला धडा यापैकी कशाला महत्व द्यायचे याचा निर्णय करताना सर्वांचीच कसोटी पाहिली जाणार आहे. परंतु सामान्य माणसाचे या गोंधळाच्या परिस्थितीत योग्य ते प्रबोधन होईल असाच प्रयत्न झाला पाहिजे. त्याच्या वैचारिक गोंधळामध्ये भर पडेल असे काही होता कामा नये आणि ही जबाबदारी सगळ्याच माध्यमांची आहे. केवळ नाट्यसंमेलन भरले म्हणून नाटकवाल्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा मांडायचा आणि साहित्य संमेलनवाल्यांनी विचार स्वातंत्र्याचा मुद्दा मांडून आपले म्हणणे पुढे रेटायचे. असेही होता कामा नये. या सर्वांनी सामान्य माणूस किंवा समाज म्हणून विचार केला पाहिजे. आणि त्या त्याकाळासाठी जे जे अनुरूप असेल उपयुक्त असेल त्याचीच आग्रहाने मांडणी केली पाहिजे. निदान सध्याची वेळ तक्रारी करण्याची नाही. तर समाजाला योग्य मार्गदर्शन करण्याची आहे. नागपुरातले नाट्यसंमेलन ज्या काळात भरले आहे किंवा देशात जी परिस्थिती आहे. त्याचा विचार करूनच मतप्रदर्शन झाले पाहिजे.